संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पाक लष्कराची खुमखुमी अजूनही कायम

**भारतीय** वायूदलाचे सैनिक अभिनंदन वर्तमान यांना सुखरूपपणे परत मिळवण्यात भारताने दाखवलेला मुत्सद्दीपणा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. परंतु एकीकडे हे हस्तांतरण सुरू असताना काश्मिरच्या नौशेरा, कूपवाडा भागात पाकिस्तानी सैन्याकडून गोळीबार सुरुच होता. भारताने पाक हद्दीत घुसून जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेला जबरदस्त तडाखा दिल्यानंतर पाकचे पंतप्रधान इम्रान खान यांनी शांततेची भाषा बोलायला सुरुवात केली होती. परंतु पाकिस्तानी लष्कराला भारताबरोबरचे संबंध सुधारण्याची इच्छा दिसत नाही. सर्व बाजूंनी या देशाची कोंडी होत आहे. सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती डबघाईला आली असताना तिथले लष्कर आपल्याच मस्तीमध्ये वागताना दिसते. त्यांची खुमखुमी अजून जिरलेली नाही. भारतीय वैमानिक अभिनंदन यांचे हस्तांतरण करतानासुध्दा मुद्दाम विलंब केला गेला. नको त्या चौकशा आणि तपासण्या केल्या गेल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या जिनेव्हा करारानुसार अशा प्रकारे युध्दकाळात किंवा एरवीसुध्दा शेजारच्या राष्ट्रातील सैनिक या प्रदेशात अडकला असेल तर त्याला सुखरुप पोहचवण्याची जबाबदारी त्या देशावर टाकली गेलेली आहे आणि जर तसे केले नाही. तर या कराराचा भंग केला म्हणून संबंधित देश प्रत्युत्तर देऊ शकतो. हे समजून घेण्याची पाकिस्तानची तयारी नव्हती. भारताने पुलवामा हल्ल्याचा पुरेपूर बदला घेतला. विशेष म्हणजे भारताच्या या कृतीला जगाकडून अनपेक्षित प्रतिसाद मिळाला. जवळपास सर्वच देशांनी पाकिस्तानला दोषी ठरवले आणि तिथली दहशतवादी केंद्रे नाहीशी करण्याचे आवाहन केले. चीन, अमेरिका, इंग्लंड या देशांनी दोन्ही देशात शांतता प्रस्थापित व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. परंतु पाकिस्तानची त्याला तयारी दिसत नाही. प्रामुख्याने तिथले लष्कर हेच आता तिथल्याही आणि भारत-पाक संबंधातल्या अशांततेचे मोठे कारण ठरू पाहात आहेत. पाकिस्तानच्या राज्यघटनेप्रमाणे तिथल्या पंतप्रधानापेक्षाही लष्कराला अमर्याद अधिकार आहेत. लोकांनी निवडून दिलेल्या या पंतप्रधानालाही लष्कराच्या अधिन राहून बरेच निर्णय घ्यावे लागतात. अशा या विचित्र कार्यपध्दती असलेल्या देशात लोकशाही नावाचे कोणतेही मूल्य टिकून राहू शकत नाही. आणि जगाचा इतिहास असे सांगतो की जिथे लोकशाही नाही तिथे कोणत्याच प्रकारची शांतता नांदू शकत नाही.

### पाकमधली अस्वस्थता

भारताने अतिशय योजनापूर्वक तिथल्या बालाकोट भागामध्ये हवाई हल्ला करून फक्त दहशतवाद्यांचा खात्मा केला. एकाही लष्करी तळाला किंवा नागरी वस्तीला धक्का न लावता भारतानेही अतिशय जोखमीची कारवाई यशस्वीपणे पार पाडल्याने जगालादेखील भारताच्या ताकदीचे एक नवे दर्शन घडले. स्वाभाविकपणे जगातले अनेक देश भारताच्या पाठीमागे उभे राहिले आणि त्या आंतरराष्ट्रीय दबावामुळे पाकिस्तानला अनेक आघाड्यांवर नमते धोरण घ्यावे लागले. त्यातूनच अभिनंदन वर्तमान या भारतीय वैमानिकाची सुखरूप सुटका करण्याशिवाय पाकिस्तानला पर्याय राहिला नव्हता. या सगळ्या घटना पाकिस्तानच्या वर्मावरच आणि तथाकथित स्वाभिमानावरच घाला करणाऱ्या ठरल्या. ती अस्वस्थता पाकिस्तानी लष्करामध्ये खदखदते आहे. गेल्या चार दिवसांपासून किमान पन्नासवेळा सीमेपलिकडून गोळीबार केला गेला आणि त्यात भारताचे पाच जवान कामी आले. पाकच्या या कुरापतीला भारत तसेच प्रत्युत्तर जरी देत असला तरी त्यात पाक लष्कराचे कोणतेही नुकसान होताना दिसत नाही. याचा अर्थ पुढचे अनेक महिने पाकिस्तानकडून अशा प्रकारच्या कारवाया सुरु राहातील आणि छोट्या प्रमाणावर का होईना परंतु भारतीय लष्कराचे नुकसान करण्याचा डाव साधला जाईल. हा सगळा घटनाक्रम पाकिस्तानला शांतता नको असल्याचे निदर्शक ठरतो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाकिस्तानी लष्कर पुन्हा दहशतवाद्यांची मदत घेऊन प्रामुख्याने काश्मीरमध्ये हल्ले घडवण्याच्या तयारीत राहील हे स्पष्ट होते. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन भारताला आपली भूमिका ठरवावी लागेल. नेमक्या निवडणुक कालावधीमध्ये भारत-पाक सीमेवरची ही अशांतता एकूणच देशासाठी आव्हानात्मकच म्हटली पाहिजे. ज्या देशाला शांतताच नको आहे त्याला सतत अशांत ठेवण्याचे काम भारताला करावे लागेल. म्हणूनच अधिक व्यापक स्तरावर आणि दीर्घकालीन उपाय योजून पाकिस्तानची आणि त्यातही तिथल्या लष्कराची नाकेबंदी करण्याची वेळ आलेली आहे.

### भारत पाक संबंध निर्णायक वळणावर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताने केलेला हल्ला हा एक पायलट प्रोजेक्ट होता असे म्हटले होते. तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानला इशारा देत असतानाच दोन्ही देशांमधून लवकरच चांगली बातमी येईल अशी अपेक्षा व्यक्त केली गेली होती. या दोन्ही विधानांचे अन्वयार्थ जर काढले तर भविष्यकाळात पाकिस्तानच्या नाड्या या भारत आणि अमेरिका यांच्या हातात राहू शकतील. इतर बिगर लष्करी उपाय योजून पाकिस्तानला सुधारण्याचा प्रयत्न केला जाण्याची शक्यता आहे. पश्चिम आशिया खंडामध्ये भारत हा तितकाच प्रभावी देश ठरत असल्याने त्याच्या व्यापक भूमिकेवरच तिथली शांतता टिकून राहू शकते. पाकिस्तानसारख्या असमंजस किंवा अपरिपक्व देशाला हाताळण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण आज या देशातील राजकीय व्यवस्था हतबल झालेली दिसते. लष्करावर कोणाचेही नियंत्रण नाही. उलट दहशतवादी लष्कराचाच उपयोग करून आणखी काही मोठा गोंधळ घालण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच भविष्यकाळात तिथल्या राजकीय व्यवस्थेला निमित्त करून लष्कर आणि दहशतवादी या दोघांवरही नियंत्रण आणण्याचे काम भारत आणि अमेरिकेसारख्या देशाला करावे लागेल. अशी एकूण लक्षणे दिसतात. कदाचित ती व्यापक योजना भारताकडे तयार दिसते. यासाठीच मोदींनी पायलट प्रोजेक्टनंतरची मोठी तयारी बाकी असल्याचे सूचक विधान केले असावे. गेल्या काही दिवसातल्या या सर्व घडामोडी भारत-पाक संबंधाला एका निर्णायक वळणावर किंवा टप्प्यावर नेणाऱ्या ठरतात.